गृह विभागाकडील शासन परिपत्रक दि.२६.०९.१९७२ रोजीच्या मार्गदर्शक सूचनाचे (Guidelines) काटेकोरपणे अंमलबजावणी करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन परिपत्रक क्र. बिव्हीपी १११६/प्र.क्र.४९२/पोल-८
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक :- ०६ फेब्रुवारी, २०१८.

परिपत्रक

गृह विभाग, शासन निर्णय क्र. बीव्हीपी ०६११/प्र.क्र.४१८/पोल-८, दि.१५.१०.२०११ अन्वये दि. ०१.०१.२०१२ पासुन राज्यातील पोलीस पाटलांचे मानधन रु. ८००/- वरुन रु. ३,०००/- इतकी वाढ करण्यात आलेली आहे. पोलीस पाटील यांना अदा करण्यात येत असलेल्या मानधनामध्ये अनियमितता (irregularities) झाल्याचे निरीक्षण अधिकारी (ऑडीट) महालेखाकार कार्यालय, मुंबई यांना पोलीस अधिक्षक ठाणे (ग्रामीण) या कार्यालयाचे लेखापरीक्षण करताना आढळुन आले आहे. त्यामुळे दि.२६.०९.१९७२ च्या परिपत्रकातील मागदर्शक सुचनांची (Guidelines) काटेकोरपणे अंमलबजावणी होत नसल्याबाबत निरीक्षण अधिकारी (ऑडीट) यांनी लेखी आक्षेप घेतलेला आहे.

२. गृह विभाग, शासन परिपत्रक दि. २६.०९.१९७२ च्या मार्गदर्शक सुचना (Guidelines) खालील प्रमाणे आहेत.

The Police Patils should be required to maintain muster rolls in which they themselves should mark their presence daily. In addition, they should maintain a visitors book in which the visiting officers of the Revenue and Police Departments should make entries about the work and attendance of the Patils based on information gathered locally during their visits.

उपरोक्त नमुद केल्यानुसार गृह विभाग, शासन परिपत्रक दि. २६.०९.१९७२ रोजीच्या मार्गदर्शक सुचनांच्या (Guidelines) अनुषंगाने राज्यातील प्रत्येक पोलीस पाटील यांनी स्वत:चे हजेरीपट (Master Roll) ठेवुन (Maintain) त्यांनी त्यामध्ये दररोज उपस्थितीची नोंद घेणे आवश्यक आहे. त्याशिवाय त्यांनी अभ्यांगत नोंदवही (Visiters Book) देखील ठेवली पाहिजे . ज्या वेळी महसुल अथवा पोलीस विभागाचे अधिकारी गावाला भेट देतील त्या भेटी दरम्यान त्यांनी स्थानिक पातळीवर गोळा केलेला माहितीच्या आधारे पोलीस पाटील यांच्या कामाची व उपस्थितीची नोंद अभ्यांगत नोंदवहीमध्ये घेणे आवश्यक आहे.

३. पोलीस ठाण्याच्या हद्दीत एखादा कायदा व सुव्यववस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास, त्या ठिकाणी त्या वेळी पोलीस पाटील यांची उपस्थिती अत्यावश्यक असते. त्यामुळे एखादया अप्रिय घटनेच्या वेळी संबंधित पोलीस पाटील हे त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये प्रत्यक्षात हजर होते किंवा नाही याबाबत त्यांचे हजेरीपटावरुन आढावा घेणे सोईस्कर होईल.

४. यापुढे पोलीस पाटील यांना मानधन व भत्ते अदा करताना अनियमितता होऊ नये त्यादृष्टीने दि. २६.०९.१९७२ च्या परिपत्रकातील मार्गदर्शक सुचनाचे काटेकोर अंमलबलावणी करण्याची दक्षता घेण्यात यावी. तरी त्याप्रमाणे संबंधित पोलीस अधिक्षक यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना त्याप्रमाणे तात्काळ सूचना देण्यात याव्यात.

५. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना विनंती करण्यात येते की, या संदर्भात दि. २६.०९.१९७२ च्या परिपत्रकातील मार्गदर्शक सुचनाची अमंलबजावणी आपल्या अधिपत्याखालील घटक कार्यालयामार्फत काटेकोरपणे होते किंवा कसे याबाबत देखरेख (Monitoring) ठेवावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१८०२०६१५५५४७६२२९ असा आहे. शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sudhaker D. Pawar

Digitally signed by Sudhakar D. Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2c1ebd27661971090dc2c91d4bb9caabd4da394aa85829a09265097faf097ba5, cn=Sudhakar D. Pawar
Date: 2018.02.06 16:00:39 +05'30'

(सु.धो. पवार)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२) सर्व जिल्हा अधिकारी
३) सर्व पोलीस अधिक्षक
४) अप्पर मुख्य सचिव (गृह) यांचे स्वीय सहायक
५) प्रधान सचिव (विशेष) यांचे स्वीय सहायक
६) उप सचिव (पोल-८) यांचे स्वीय सहायक
७) निवड नस्ती- (पोल-८)